९८५

**परिपत्रक :**

जा.क्रं.रागुअके/संगणक/CCTNS/ /२०१०
अपर पोलीस महासंचालक, गु.अ.वि.म.रा. पुणे
यांचे कार्यालय
पुणे दि. /०१/२०१० - 1 FEB 2010

संदर्भ - १) शासन निर्णय क्र.एमआयएस ०५०८/७४८/प्र.क्र.३२९/पोल - ४ मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ , दि. २२/५/२००९.

२) पोलीस महासंचालक कार्यालय,मुंबई यांचे परिपत्रक क्रं. पमसं/१७/६१६२/सीसीटीएनएस/२००९ मुंबई दि.३/१२/२००९

**विषय -** CCTNS प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी Capacity Building Infrastructure तयार करणेबाबत .

********

भारत सरकार गृह मंत्रालय, नवी दिल्ली कडून ई-गव्हर्नन्स योजने अंतर्गत Crime Criminal Tracking Network and System ( CCTNS) हा प्रकल्प Mission Mode Project म्हणून महाराष्ट्र राज्यातील सर्व पोलीस घटक, पर्यवेक्षीय कार्यालये, पोलीस ठाणी , राज्य गुन्हे अभिलेख केंद्र, गु.अ.वि., म.रा., पुणे व पोलीस महासंचालक कार्यालय, मुंबई येथे कार्यान्वित करण्याचे प्रायोजित आहे. सदर प्रकल्पांतर्गत गुन्हे, गुन्हेगारीबाबतची सर्व प्रकारची माहिती सुलभरित्या व विनाविलंब उपलब्ध करून देणेकामी सर्व पोलीस ठाणी व वरिष्ठ कार्यालये संगणीकृत करून संगणक जाळे मार्फत जोडण्यात येणार आहे .

सदर प्रकल्पाच्या परिणामकारक व प्रभावी अमंलबजावणी करिता निरनिराळया समित्या / टीम गठीत करण्यात आल्या आहेत. त्या अनुषंगाने उपरोक्त संदर्भान्वये महाराष्ट्र राज्यातील सर्व पोलीस घटकांमध्ये District Mission Team गठीत करण्यासाठी पोलीस महासंचालक कार्यालयाकडून दिनांक ०३/१२/२००९ रोजी निर्गमित करण्यात आलेल्या परिपत्रकाप्रमाणे घटक स्तरावर District Mission Team गठीत करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

सदर प्रकल्पाच्या परिणामकारक हाताळणीसाठी प्रशिक्षित मनुष्यबळाची नितांत आवश्यकता आहे. त्या दृष्टिकोनातून जिल्हास्तरावर सेवांतर्गत संगणकीय प्रशिक्षण सुरू करण्यासाठी CCTNS प्रकल्पांतर्गत

Capacity Building Infrastructure उभारण्यासाठी State Empowered Committee च्या मान्यतेनंतर पोलीस महासंचालक, म.रा.,मुंबई कार्यालयामार्फत लवकरच संगणक, LCD प्रोजेक्टर (स्क्रीनसह), संगणक टेबल व खुर्च्या इत्यादी साधनसामुग्री पुरविण्यात येणार आहे. सदर संगणक साधनसामुग्रीच्या विद्युतीकरण व लॅन केबलींगसाठी निधी देखील पोलीस महासंचालक, म.रा., मुंबई कार्यालयामार्फत उपलब्ध करून देण्यात येणार आहे. **त्यासाठी सर्व घटकप्रमुखांनी प्राधान्याने सदर Capacity Building प्रशिक्षणाकरिता साधारणत: ५०० चौरस फूट ( २४x२० ) आकाराचा एक स्वतंत्र कक्ष निश्चित करून ठेवावा. हा प्रशिक्षण कक्ष स्वच्छ, धुळ विरहीत, पावसाळ्यामध्ये न गळणारा व भिंतींना ओल न येणारा असावा. तसेच कक्षास रंगरंगोटी करण्यात आलेली असावी.** सदर प्रशिक्षणासाठी *NCRB* नवी दिल्ली यांचेकडून प्राप्त ३ IT Basics Module व २ IT *Advance Module* पाठ्यक्रमाच्या छायांकित प्रती सोबत जोडण्यात आल्या आहेत.

तरी सर्व घटक प्रमुखांनी CCTNS - Capacity Building Infrastructure संदर्भात पुर्व तयारी करून पूर्तता अहवाल या कार्यालयास पाठवावा , ही विनंती

30/1/10

(एस.पी.एस.यादव )
अपर पोलीस महासंचालक ,
गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे व
Chairman , State Mission Team
CCTNS Project.

प्रति,

१. सर्व पोलीस आयुक्त, महाराष्ट्र राज्य.
२. सर्व पोलीस अधीक्षक, महाराष्ट्र राज्य.

प्रत माहितीस्तव व योग्य त्या पुढील कार्यवाहीसाठी -
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य.